# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:05.07.2025** **वार:शनिवार**

---

1. प्रत्येक क्षेत्रात देशाला अग्रेसर ठेवण्याची प्रेरणा थोरले बाजीराव पेशवे यांच्या जीवन चरित्रातून मिळते-केंद्रीय मंत्री अमित शहा यांचं प्रतिपादन
2. राज्यातल्या शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या बनावट पदभरती प्रकरणी फौजदारी गुन्हा दाखल करण्याचे सरकारचे आदेश
3. मराठीचा अभिमान असावा मात्र त्यासाठी कायदा हातात न घेण्याचं मुख्यमंत्र्यांचं आवाहन
4. पंढरीच्या वेशीवर विठ्ठलनामाचा जयघोष; संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम यांच्यासह विविध संतांच्या पालख्या वाखरीत दाखल आणि
5. अँडरसन-तेंडुलकर चषक स्पर्धेतील दुसऱ्या कसोटी क्रिकेट सामन्यात तिसऱ्या दिवस अखेर भारताकडे 244 धावांची आघाडी

**शहा**

देश परदेशातील युद्धकौशल्यातील अभ्यासू सेनानींनी थोरले बाजीराव पेशवे यांच्या युद्ध कौशल्याचा गौरव केला आहे, असं प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी काल पुण्यात केलं. संपूर्ण विश्वात प्रत्येक क्षेत्रात आपला भारत देश पुढे राहील यासाठीची प्रेरणा आणि ऊर्जा थोरले बाजीराव पेशवे यांच्या जीवनचरित्रातून मिळते, असं ते म्हणाले. राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी परिसरातील त्रिशक्ती प्रवेशद्वारावर उभारण्यात आलेल्या थोरले बाजीराव पेशवे यांच्या अश्वारूढ पुतळ्याचं अनावरण अमित शहा यांच्या हस्ते काल झालं; त्यावेळी ते बोलत होते. गुलामीचं निशाण जिथं आहे ते उध्वस्त करुन स्वातंत्र्याचा दीप लावण्याचं काम बाजीराव पेशव्यांनी यशस्वीपणे केलं असं सांगून ते म्हणाले...

**एनडीए पुणे की एकेडमी जहां से आने वाले समय के देश की तीनों सेनाओं के सूत्रधार जहां प्रशिक्षित होकर निकलते हैं वहां बाजीराव पेशवा की मूर्ति लगना और श्रीमंत बाजीराव के मूर्ति से प्रेरणा लेकर अगर हमारे भविष्य के सेनानी जा हैं तो मुझे विश्वास है कि कई सालों तक भारत की सीमाओं को कोई छूने का साहस नहीं कर सकते। युद्ध की कला के कुछ नियम जो होते हैं वो कालबाह्य नहीं होते हैं। वो एनल होते हैं। युद्ध में व्यूह रचना का महत्व, युद्ध में त्वरा का महत्व युद्ध में समर्पण का भाव। युद्ध में देशभक्ति का भाव और सबसे बड़ी बात युद्ध में बलिदान का भाव वही सेनाओं को विजय दिलाता है और अगर ये सभी गुणों का सबसे उत्कृष्ट उदाहरण पाँच सौ साल के भारतीय इतिहास में कहीं पर ढूंढना है वो केवल श्रीमंत बाजीराव पेशवा में ही मिल सकता।**

या कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, लष्कराच्या दक्षिण विभागाचे प्रमुख लेफ्टनंट जनरल धीरज शेठ यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

उत्तरेला काबूलपर्यंत आणि पूर्वेला बंगालपर्यंत मराठी साम्राज्याचा विस्तार करण्याचं काम थोरल्या बाजीराव पेशव्यांनी केल्याचं मुख्यमंत्री फडणवीस यावेळी म्हणाले....

**अतिशय वीर असलेले श्रीमंत पेशवे थोरले बाजीराव यांचा जो इतिहास आहे तो छत्रपतींच्या स्वराज्याला आणि साम्राज्याला विस्तारित करण्याचा इतिहास आपल्याला पाहायला मिळतो एक्केचाळीस लढाया एकाही लढाईमध्ये पराजय**

**नाही आणि मोगल असो निजाम असो पोर्चुगीज असो सर्व प्रकारच्या शत्रूला नामोहरम करण्याचं हे थोरल्या बाजीरावांनी केलं अशा सगळ्या त्या काळच्या अखंड भारतामध्ये हिंदवी स्वराज्याची आणि मराठा साम्राज्याची स्थापना किंवा त्याचा विस्तार करण्याचं काम हे थोरल्या बाजीरावांनी केलं आणि त्यांच्यावर अतिशय कमी वयामध्ये शाहू महाराजांनी जो विश्वास टाकला होता त्या विश्वासाला सार्थ करण्याचं काम हे त्यांच्या माध्यमातून झालेलं आपल्याला पाहायला मिळालं.**

या कार्यक्रमानंतर शाह यांनी एनडीए च्या छात्रांशी संवाद साधला.

**<u>गुजराती समाज शहा</u>**

पुणे गुजराती समाजाच्या वतीनं बनवण्यात आलेल्या जयराज स्पोर्ट्स आणि कन्वेंशन सेंटरचं उद्घाटनही केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते काल झालं. सामाजिक योगदान देणाऱ्या गुजराती बांधवांचा यावेळी शहा यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आपल्या भाषणात गुजराती समाजानं पुण्याच्या विकासात दिलेल्या योगदानाविषयी गौरवोद्गार काढले.

**<u>पीएचआरसी</u>**

पुण्यातील पीएचआरसी लाइफस्पेस हेल्थ सिटीचं भूमिपूजनही काल केंद्रीय मंत्री अमित शहा यांच्या हस्ते झालं. पीएचआरसी लाइफस्पेस हेल्थ सिटीच्या या प्रकल्पामुळे केवळ पुण्यालाच नाही तर पश्चिम महाराष्ट्राला आरोग्य सुविधा मिळणार असल्याचं अमित शहा म्हणाले. आपल्या भाषणात त्यांनी केंद्र सरकारच्या विविध योजना, कोवीडच्या संकट काळात भारतानं जागतिक स्तरावर दिलेल्या योगदानाचा आढावा घेतला.

**<u>मांझी</u>**

2029 पर्यंत भारतीय अर्थव्यवस्था जगात तिसऱ्या स्थानावर नेण्यासाठी शेती क्षेत्राबरोबरच सूक्ष्म, लघू, आणि मध्यम उद्योगाचं महत्वपूर्ण योगदान असेल असं केंद्रीय सूक्ष्म, लघू, मध्यम उद्योग मंत्री जीतन राम मांझी यांनी काल मुंबईत सांगितलं. सह्याद्री अतिथीगृह इथं आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. एमएसएमई विभागाच्या माध्यमातून रोजगार देण्यात येणाऱ्या नवउद्योजकांची उद्यम पोर्टलद्वारे नोंदणी करून घेतली जात आहे. आतापर्यंत देशातील 34 कोटी बेरोजगारांना रोजगार देण्याची प्रक्रिया एमएसएमई विभागानं केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं 22 कोटी बेरोजगारांना रोजगार देण्याचं स्वप्न या एका विभागानं पूर्ण केल्याचंही मंत्री मांझी यांनी सांगितलं.

**<u>विधिमंडळ</u>**

राज्यातल्या शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा बनावट पदभरती प्रकरणी, संबंधित विभाग आणि शिक्षणसंस्थांच्या अधिकारी, कर्मचारी आणि पदाधिकाऱ्यांविरोधात फौजदारी गुन्हा दाखल करायचे आदेश दिले असल्याची माहिती शालेय शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर यांनी विधान परिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात सभागृहाला दिली. आमदार सुधाकर अडबाले यांनी याबाबतचा प्रश्न विचारला होता. या प्रकरणी एका महिन्याच्या आत राज्यस्तरीय चौकशी समिती स्थापन केली जाणार असल्याचंही भोयर यांनी सभागृहाला सांगितलं.

राज्यातल्या शेतकऱ्यांना नैसर्गिक आपत्ती, अपुरा हमीभाव, अपूरी नुकसान भरपाई आणि कर्जमाफीच्या अंमलबजावणीतलं दुर्लक्ष यामुळे मोठ्या अडचणींना सामोरं जावं लागत असल्याचा आरोप विधान परिषदेतले विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी केला. राज्य सरकारनं शेतकऱ्यांना सौर पंप देण्याची घोषणा केली असली, तरी प्रत्यक्षात 3 लाख 31 हजार अर्ज सरकारकडे पडून आहेत, असाही आरोप दानवे यांनी आज नियम 260 अन्वये मांडलेल्या ठरावादरम्यान केला.

राज्यातल्या मालमत्ता खरेदी विक्रीच्या नोंदणीनंतर संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांना त्यांच्या हिश्शाची एक टक्का रक्कम त्वरित देण्यासाठी वेगळी यंत्रणा तयार केली जाईल, अशी ग्वाही महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी काल

विधानसभेत एका लक्षवेधीच्या उत्तरात दिली. या विषयावर अर्थमंत्री आणि मुख्यमंत्र्यांसमवेत चर्चा करणार असल्याचंही त्यांनी सांगितलं.

**मराठी भाषा-फडणवीस**

महाराष्ट्रात मराठीचा अभिमान बाळगणं हे अजिबात चुकीचं नाही. पण, भाषेच्या मुद्द्यावरून कुणालाही मारहाण करणं चुकीचं आहे. अशा प्रकारच्या कृत्यांवर कायदेशीर कारवाई केली जाईल, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. काल मुंबईत वार्ताहरांशी बोलताना मुख्यमंत्री म्हणाले......

**महाराष्ट्रात मराठी बोलली गेली पाहिजे हा आग्रह चुकीचा नाही पण एखाद्या व्यावसायिकाला मराठी येत नाही म्हणून मारहाण करणं हे पूर्णपणे चुकीचं आहे आणि म्हणून अशा प्रकारची गुंडशाही जर केली तर त्याच्यावर योग्य कारवाई केली जाईल.**

**पालखी**

पंढरपूरचा परिसर आता टाळ मृदुंगाचा निनाद आणि हरी नामाच्या जयघोषानं फुलून गेला आहे. राज्यासह, देशाच्या विविध भागातून निघालेल्या संतांच्या पालख्याही काल वाखरीत दाखल झाल्या. संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यातील गोल रिंगण आणि संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्यातील उभं रिंगणही काल बाजीराव विहिरीजवळ रंगलं. यावेळी वारकरी विठू नामाच्या जयघोषात तल्लीन झाले होते. त्यानंतर पालखी सोहळा पंढरपूरच्या वेशीवर असलेल्या वाखरी पालखी तळावर विसावला. आज दुपारी वाखरीमधून पालखी सोहळा पंढरपूरकडे प्रस्थान करणार आहे.

**क्रिकेट**

अँडरसन-तेंडुलकर चषकासाठी इंग्लंडमध्ये एजबस्टन इथं सुरू असलेल्या दुसऱ्या कसोटी क्रिकेट सामन्यात कालच्या तिसऱ्या दिवस अखेर भारताला 244 धावांची आघाडी मिळाली आहे. कालचा खेळ संपला तेव्हा भारताच्या 1 गडी बाद 64 धावा झाल्या होत्या. तत्पूर्वी यजमान संघाचा पहिला डाव 407 धावांत आटोपला. भारताकडून महंमद सीराजनं सहा आणि आकाशदीपनं चार बळी घेतले.

**हवामान**

येत्या दोन दिवसांत कोकणात बहुतांश ठिकाणी जोरदार पावसाची तसंच किनारपट्टीवर सोसाट्याचा वारा वाहण्याची शक्यता आहे. येत्या 24 तासात मध्य महाराष्ट्रातल्या घाट परिसरातही मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता हवामान खात्यानं वर्तवली आहे. विदर्भात तुरळक ठिकाणी जोरदार पावसाचा अंदाज असून मराठवाड्यातही काही ठिकाणी पावसाचा अंदाज आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.